1) **Solving Sensational Crime**

2) Dindori Police Station And Vani Police Station

3) 16/10/2015 to 22/11/2015

**<u>Brief Facts</u>** :

On 16/10/2015 between 03.00 hrs to 03.45 hrs four unknown accused came in Bolero jeep at Radhakrishna Petrol Pump in the jurisdiction of Dindori Police Station. They assaulted persons on duty and forcefully looted Rs. 1,85,000/- and six mobile phones. An offence vide Dindori PS C.R. 177/2015 u/s 394 IPC was registered.

Similarly on 22/10/2015 between 03.15 to 03.40 hrs five unknown accused came in Bolero jeep at Bramha Petrol Pump in the jurisdiction of Vani Police Station. On the point of Pistol, accused persons beat persons on duty and looted Rs. 45,500/- and mobile phones. An offence vide Vani PS C.R.No. 125/2015 u/s 395 IPC r/w 3/25 Arms Act.

After initial investigation, police came to conclusion that same gang was involved in both incidents. Shri. Nawale, Police Inspector, Local Crime Branch formed three special teams for detection of offence. Technical mobile data was analysed. Members of gangs involved in similar offences were checked. Informants were asked to provide any information regarding these offences. After thorough investigation, police narrowed down on suspect named Vijay Ganpat Jadhav, R/o Gondhawni Road, Srirampur, District Ahmednagar. Team of Local Crime Branch laid a trap and nabbed Vijay Jadhav in Srirampur. After thorough interrogation, he confessed about commission of both the offences. He has disclosed the names of other accused persons involved in the crime. Pistol and Bolero used in the commission of offence as well as 4 stolen mobile phones have been recovered from the arrested accused.

# पेट्रोलपंप लुटणाऱ्या टोळीचा म्होरक्या जेरबंद

▶▶ बोलेरो जीप, रिव्हॉल्व्हर जप्त

▶▶ पाच दरोड्यांची कबुली

। दिंडोरी । प्रतिनिधी ।

रात्रीच्या वेळी पेट्रोलपंप लुटणाऱ्या टोळीच्या म्होरक्यास नाशिक ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेने काल अटक केली. त्याच्याकडून गुन्ह्यासाठी वापरलेली बोलेरो जीप, रिव्हॉल्व्हर जप्त करण्यात आले. दिनांक २२-१०-२०१५ रोजी मध्यरात्री वणी सापुतारा रोडवर माळे शिवारात ब्रम्हा पेट्रोलपंप या ठिकाणी आलेल्या बोलेरो गाडीतील गुन्हेगारांनी डिझेलची मागणी केली. पेट्रोलपंपाच्या कॅबीनचा दरवाजा उघडण्यास भाग पाडून पिस्तुलाचा धाक दाखवून ४५,५००/- रु. रोख व मोबाईल असा ऐवज जबरीने नेला होता. याबाबत वणी पोलिस ठाण्यास गुरनं १२५/२०१५, भादंवि ३९५ अन्वये गुन्हा दाखल झाला होता. तसेच त्याअगोदर दिनांक १६-१०-२०१५ रोजी देखील मध्यरात्री नाशिक - पेठ रस्त्यावर नाळेगाव शिवारात राधाकृष्ण पेट्रोलपंपावर तेथील कामगारांना लाकडी दांड्याने मारहाण करून १,८५,०००/- रु. रोख व तीन मोबाईल असा ऐवज दरोडा टाकुन लुटून नेला होता.

याबाबत पोलिस अधीक्षक संजय मोहिते यांनी दोन्ही गुन्ह्यांचा तपास स्थानिक गुन्हे शाखेने करण्याबाबत आदेश दिले. त्यानंतर अधीक्षक संजय मोहिते, अपर पोलिस







अधीक्षक प्रशांत मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक किशोर नवले, सहा. पोलिस निरीक्षक विलास तारटोकोंडलवार, पोलिस उपनिरीक्षक मच्छिंद्र रणमाळे तसेच सहा. पो. उपनिरीक्षक अनिल धुमसे, रवींद्र शिलावट, हवालदार रवींद्र वानखेडे, राजेंद्र पाटील, अशोक मोकळ, दीपक अहिरे, राजेंद्र लहारे, पो.कॉ. प्रदीप बहिरम, लहु भावनाथ, प्रवीण काकड, अमोल घुगे यांनी या गुन्ह्यातील अत्यंत गोपनियरित्या माहिती मिळविली. तसेच या प्रकरणी आरोपींनी केलेल्या प्रत्येक बारीकसारीक घटनांचा अभ्यास करून, दोन्ही दरोडे टाकणाऱ्या टोळीचा म्होरक्या विजय गणपत जाधव (वय ३२, रा. गोंदवणी रोड, श्रीरामपूर) याला शिताफीने अटक केली. त्याने वणी व दिंडोरी येथील पेट्रोलपंपावरील दरोडे तसेच धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर येथील अन्नपूर्णा पेट्रोलपंप, कुसंबा रोडवरील प्रियदर्शनी पेट्रोलपंप, सुरत साक्री रोडवरील वारकुंडाणे गावच्या शिवारातील चौधरी पेट्रोलपंप या ठिकाणी देखील पिस्तुलाचा धाक दाखवून रोख रकमा दरोडा टाकून लुटल्याचे तपासात उघड झाले आहे. गुन्ह्याच्या तपासात आरोपीने गुन्हा करण्यासाठी वापरलेली बोलेरो जीप तसेच गावठी रिव्हॉल्व्हर व साक्षीदारांचे जबरीने नेलेले मोबाईल हस्तगत करण्यात आले आहे. टोळीप्रमुख विजय जाधव हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असून, त्याने श्रीरामपूर गोंदवणी रोड भागातील साथीदारांची टोळी जमवून गुन्हे करत आला आहे. तो त्याच्या साथीदारांसोबत रात्रीच्यावेळी महामार्गालगत थांबलेल्या वाहनांच्या टँकमधील डिझेल चोरण्याची त्यांची गुन्हे करण्याची पद्धत आहे. अत्यंत गोपनियतेने स्थानिक गुन्हे शाखेने तपास करून जिल्ह्यातील २ व धुळे जिल्ह्यातील ३ दरोड्याचे गुन्हे असे एकूण ५ दरोड्याचे गुन्हे काही एक पुरावा नसताना उघडकीस आणले आहे. ही टोळी वेळीच ताब्यात आल्यामुळे इतर ठिकाणीच्या पेट्रोलपंप व पडणाऱ्या दरोड्याला निश्चितच आळा बसला आहे. गुन्हेगारांविरुद्ध औरंगाबाद, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातही गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे.